# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भंडारा जिल्हा परिषदेतंर्गत येणा-या विविध विभागातील कर्मचारी शहराच्या ठिकाणापासून नोकरीस्थित ठिकाणी ये-जा करीत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(१) ४८०० (२२-१२-२०१४) श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा परिषदेअंतर्गत येणा-या विविध विभागातील कर्मचारी शहराच्या ठिकाणापासून नोकरीस्थित ठिकाणी ये-जा करीत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय होत आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहराला १५८६ एमएलडी अतिरिक्त पाणी मिळण्यासाठी दमणगंगा-पिंजाळ हा प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत**

**(२) ६४५० (०१-०५-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा-पिंजाळ नदी प्रकल्प कार्यान्वित झाल्यास मुंबई शहराला १५८६ एमएलडी

अतिरिक्त पाणी मिळणार असल्याने दमणगंगा-पिंजाळ या प्रस्तावित प्रकल्पाचे काम तातडीने हाती घेण्यासाठी या प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प घोषित करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जानेवारी,२०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१९) : (१)** होय

(२) या संदर्भात केंद्रीय जलसंधारन मंत्री, यांचेकडे मा.मुख्यमंत्री यांचे पत्र दि. १६/०१/२०१५ अन्वये सदरहू प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित व्हावा अशी विनंती केली आहे. त्याचप्रमाणे केंद्रीय जलसंधारन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली होणा-या नदी जोड प्रकल्प बाबतच्या दि.१४/०५/२०१५ व दि.१३/०७/२०१५ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या ४ थ्या व ५ व्या बैठकीत या बाबतची मागणी मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांनी केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील वाडी रत्नागिरी येथील तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्याला मान्यता देण्याबाबत

**(३) १०६३५ (१०-०५-२०१५) श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील वाडी रत्नागिरी येथील श्री ज्योतिबा, करवीर निवासिनी श्री अंबाबाई,श्री क्षेत्र नृसिंहवाडी, कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर, श्री दत्त भोजनपात्र शिरोळ या प्रमुख देवस्थासह जिल्ह्यातील अन्य ठिकाणच्या तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा यासाठी शासनाच्या वतीने जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर या माध्यमातून तीर्थक्षेत्र विकास आराखडा सन २०१३-१४ मध्ये करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून प्रसिध्द असणारे श्री ज्योतिबा देवस्थान व करवीर निवासिनी श्री अंबाबाई, श्री क्षेत्र नृसिंहवाडी कोपेश्वर मंदिर खिद्रापूर, श्री दत्त भोजनपात्र शिरोळ या तीर्थक्षेत्राच्या परिसराचा विकास करण्याची योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयाला मान्यता देवून निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) होय. अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयातील वाडी रत्नागिरी येथील श्री.ज्योतिबा व करवीर निवासीनी

श्री.अंबाबाई यांचे तिर्थक्षेत्र विकास आराखडे अंतिम करण्यात आले आहेत. तसेच श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथील कन्यागत महापर्वकाळासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

श्री कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर व श्री दत्त भोजनपात्र शिरोळ या देवस्थानांचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) कोल्हापूर जिल्हयातील वाडी रत्नागिरी येथील श्री.ज्योतिबा तीर्थक्षेत्रासाठी दि. १.८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. २५.०० कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु. ५.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे वितरीत करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही देवस्थान समितीमार्फत सूरू आहे.

शासनाकडे रु. ७२.०० कोटीचा करवीर निवासिनी श्री अंबाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखडा सादर करण्यात आला आहे. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने सदर आराखड्यास मान्यता दिलेली आहे.

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे कन्यागत महापर्व काळासाठी प्रथम टप्प्यात रु. ६५.३० कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देवून रु. ५९.८५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील सर्व कामे पूर्ण झाली आहेत. तसेच दुस-या टप्प्यात रु. २७.५६ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देवून रु. १.७० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.सदर निधीतून प्रामुख्याने नृसिंहवाडी व अंशत: खिद्रापूर व शिरोळ येथे कामे करण्यात येत आहेत.

---

## अमरावती जिल्हयातील मेळघाट, धारणी येथील खोपनार गावामध्ये मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) २७०७७ (१७-०८-२०१५) श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट)** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मेळघाट, धारणी येथील खोपनार गावामध्ये वीज, पाणी, रस्ते व दवाखाने अश्या कोणत्याही मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव डोंगरी व दुर्गम भागामध्ये असल्याने गावामध्ये पक्के रस्ते नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांमध्ये मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील रंगुबेली ग्रामपंचायत अंतर्गत खोपनार हे गाव

अंतर्भुत आहे. सदर गावाची सन २०११ ची लोकसंख्या ३४२ असून या गावात पिण्याच्या पाण्याकरिता वरिष्ठ भूवैज्ञानिक भू.स.वि.य., अमरावती या विभागामार्फत सौरऊर्जेवर आधारित दुहेरी हातपंपाद्वारे योजना करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत सदर योजना सुरु असून सदर गावात दोन हातपंप कार्यरत आहेत. या गावाचे अंतर तालुक्यापासून ६० कि.मी. एवढे आहे. खोपनार या गावास आजपर्यंत विद्युत पुरवठ्याची सोय महाराष्ट्र विद्युत वीज वितरण कंपनीमार्फत पुरविण्यात आलेली नाही. तथापि सन २०१६-१७ मध्ये गावामध्ये ग्रामपंचायत निधीमधून ०२ व वनविभाग कार्यालय यांच्याकडून ०५ असे एकूण ०७ सौर पथदिवे गावामध्ये लावण्यात आलेले असून ते सर्व सौर पथदिवे सद्य:स्थितीत सुरु आहेत. त्याचप्रमाणे खोपनार हे गाव डोंगरी व दुर्गम भागामध्ये असल्यामुळे गावात पिण्याचे पाण्याकरिता मुख्य स्त्रोत दोन कुपनलिका (हातपंप) असून संपुर्ण गाव पाण्याकरिता त्यावर निर्भर आहे. गावाकरिता मुख्य दळणवळणाकरिता रस्ता चौराकुंड, ता.धारणी या गावापासून असून सदर रस्ता हा खडीकरण स्वरुपाचा आहे. गावात आरोग्याच्या सोईच्या दृष्टीकोनातून आरोग्य उपकेंद्र अस्तित्वात आहे. खोपनार गावातील नागरीक प्रामुख्याने शेतीचा व्यवसाय करीत असून उन्हाळ्याचे दिवसात ते ग्रामपंचायतीचे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामावर मजुरीकरीता येतात. त्यामुळे तेथील नागरकांना आपल्या कामासाठी पायपीट करावी लागत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा नदीला प्रदुषणाचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(५) ३१३५४ (२२-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा नदीच्या तिरावर स्थानिक ग्रामपंचायतीकडून कचरा टाकत असल्याने या नदीला प्रदुषणाचा धोका निर्माण झाला आहे तसेच रायगड जिल्ह्यातील माणगांवसह ७४ ग्रामपंचायतींकडे हजारो क्विंटल कचरा गोळा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासंदर्भात तसेच डंपिंग ग्राउंडसाठी शासनाने कोणती उपाययोजना केल्या आहेत,

(३) तसेच सदरहू प्रदुषित पाण्यामुळे शेतजमीन नापीक झाली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत प्रदुषण मंडळाने कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२८ (५)

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही. रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात पाताळगंगा ही नदी वाहत असून या नदीच्या तीरावर स्थानिक ग्रामपंचायतींकडून कचरा टाकला जात नाही.तसेच माणगाव तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतींकडे गोळा होणा-या कच-याची विल्हेवाट ग्रामपंचायतींमार्फत करण्यात येते. माणगाव तालुक्यातील कुठल्याही नदीच्या तीरावर कचरा टाकला जात नाही. त्यामुळे नदी प्रदुषणाचा धोका निर्माण झाला आहे अशी परिस्थिती नाही.

(२) प्रश्न उद्भवत नसला तरी, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. रायगड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) हे खरे नाही

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण येथील संत एकनाथ महाराज दिंडी मार्ग विकसीत करुन सुविधा देण्याबाबत**

**(६) ६२४४८ (२९-०८-२०१६) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत ज्ञानेश्वर महाराज दिंडी आळंदी तसेच संत तुकाराम महाराज दिंडी देहू येथून निघणाऱ्या दिंडीचा मार्ग चौपदरी करण्यात आला असून त्या दिंडीसाठी आरोग्यसेवा, पाणी पुरवठा, पोलीस बंदोबस्त ठेवला जातो तसेच पैठण येथील संत एकनाथ महाराज यांचा दिंडी मार्ग औरंगाबाद, अहमदनगर, बीड,उस्मानाबाद,सोलापूर या ५ जिल्ह्यातून जातो व सुमारे २५० कि. मी. मार्ग अनेक ठिकाणी खड्ड्यातून, कडे कपारीतून, शेत मार्गातून तर बीड जिल्ह्यातील धनगरवाडी या भागातील रस्ता डोंगर माथ्यातून जात असल्याने पालखी रथ वारकऱ्यांना हाताने ४ ते ५ कि. मी. ढकलत न्यावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर मार्गावर पालखी मार्ग असा रेडियममधून फक्त फलक लावला असून पालखी बरोबर इतर कुठल्याच सोयी व सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत व बंदोबस्तासाठी फक्त १ हवालदार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) हे अंशतः खरे आहे.

शासनाने संत एकनाथ महाराज पैठण पालखीसाठी दिंडी मार्ग विकसित केला आहे. संत एकनाथ महाराजांची पालखी पैठणहून पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना मोठ्या प्रमाणावर भाविक पालखी मार्ग म्हणून विकसित केलेल्या मार्गाने प्रवास करण्याऐवजी धनगरवाडी मार्गे प्रवास करतात. सदर मार्ग डोंगरमाथ्यावरून जात असल्याने पालखी रथ वारक-यांना हाताने ४ ते ५ कि.मी. ढकलत न्यावा लागतो.

(२) व (३)

संत एकनाथ महाराज पैठण पालखीसाठी पाण्याचा टँकर व वैद्यकीय पथकाची सोय केलेली असते. तसेच पोलीस अधिक्षक, औरंगाबाद जिल्ह्याच्या हद्दीत बंदोबस्ताकरिता पोलीस ठाणे, पैठणचे कर्मचारी नेमलेले असतात. अहमदनगर जिल्ह्याच्या हद्दीत पालखी मार्गावर ४ पोलीस कर्मचारी, वाहतूक शाखेचे ४ कर्मचारी नेमून सोबत मोबाईल पेट्रोलिंग ठेवले जाते.बीड जिल्ह्याच्या हद्दीत ५ पोलीस कर्मचारी यांचा वाहनासह बंदोबस्त पूरविला जातो. उस्मानाबाद जिल्ह्याच्या हद्दीत १ पोलीस अधिकारी व ५ पोलीस कर्मचारी यांची नेमणूक केली जाते.सदर मार्गावर जीप पेट्रोलिंग ठेवले जाते.सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत पालखीसोबत १ स.पो.नि., ५ पोलीस कर्मचारी, १० पूरूष होमगार्ड, ५ महीला होमगार्ड व २५ स्थानिक पोलीस मित्र असा बंदोबस्त पुरविला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मरळी, नाडे व पेठशिवापूर (ता.पाटण,जि.सातारा) या तीन ग्रामपंचायतींना ग्रामसचिवालय उभारण्यास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) ६६१७४ (२७-०१-२०१७) श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतींना ग्रामसचिवालय बांधण्याकरीता शासनाने राज्याच्या ग्रामीण विकास विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे मरळी,नाडे, पेठशिवापूर (ता.पाटण,जि.सातारा) या तीन ग्रामपंचायतींना ग्रामसचिवालय उभारण्याकरीता ग्रामीण विकास विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक ८ मार्च, २०१६ व दिनांक ६ जून, २०१६ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या तीन्ही ग्रामपंचायतींना ग्रामसचिवालय उभारण्यास ग्रामीण विकास विभागाच्या २५१५ या योजनेतंर्गत निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१९) :** (१) होय. तथापि, विविध लोकप्रतिनिधींमार्फत गावांतर्गत ज्या मुलभूत सेवा सूचविण्यात येतात त्यापैकी ग्रामसचिवालय बांधणे हे एक काम लेखाशीर्ष २५१५१२३८ या शीर्षातील असून उपलब्ध निधी व कामाच्या निकडीनुसार निधी वितरीत केला जातो.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) उपरोक्त स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचविल्याप्रमाणे सन २०१६-१७ मध्ये पाटण मतदारसंघाकरीता रु. २.०० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे. तथापि, त्यांनी

सुचविलेल्या कामांच्या यादीमध्ये प्रश्नांकीत कामांचा समावेश केलेला नसल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा यांना "ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान" या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत तसेच जिल्हा परिषदेच्या इतर योजनांमधून सदर ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला (ता.हवेली,जि.पुणे) जिल्हा परिषद बांधकाम विभागाची रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(८) ७४१५७ (१४-०४-२०१७) श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (ता.हवेली,जि.पुणे) अंतर्गत प्रत्यक्ष पाहणीत जिल्हा परिषद बांधकाम विभागाची जवळपास साठ ते पासष्ट टक्के रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कालावधीमध्ये लोकप्रतिनिधीनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत खडकवासला अंतर्गत सर्व कामांची पाहणी केली असता पाहणीमध्ये रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास,त्यानुसार रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) : (**१) व (२) नाही , हे खरे नाही.

खडकवासला मतदारसंघातील विविध लेखाशीर्षांतर्गत आमदार/खासदार निधी अंतर्गत ७ कामे , जिल्हा नियोजन समिती ग्रामीण रस्ते ६ कामे, ग्रामपंचायत कार्यालय ३ कामे, स्मशानभूमी ३ कामे, अंगणवाडी १० कामे, जि.प. निधी अंतर्गत १० कामे, दलितवस्ती अंतर्गत ७ कामे , अल्पसंख्यांक ३ कामे अशी एकूण ५८ कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी २८ कामे पूर्ण असून १५ प्रगतीत आहेत. १४ निविदास्तरावर असून २ कामांना जागेची अडचण आहे. सदर सर्व कामे चांगल्या दर्जाची असल्याबाबत उप अभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती , हवेली यांचेकडून अहवाल प्राप्त आहे.
(३) , (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात एक अत्याधुनिक ग्रामअभ्यासिका करण्याबाबत

**(९) ७५८६४ (१४-०४-२०१७) श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेने प्रत्येक तालुक्यात एक अत्याधुनिक अशी ग्रामअभ्यासिका करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राधान्याने स्पर्धा परिक्षेची तयारी करणा-या विदयार्थ्यांना याचा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. पुणे जिल्हा परिषदेने दि. २४/११/२०१६ रोजीच्या ठराव क्र. ९११ नुसार जिल्हा परिषदेच्या सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजपत्रकामध्ये शाहु फुले आंबेडकर ग्रामअभ्यासिका उभारणे या नाविण्यपूर्ण योजनेसाठी तरतूद करण्यात आली आहे.त्यानुषंगाने दि. ५/०१/२०१७ च्या आदेशान्वये जिल्हा परिषदेने पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांना शाहु फुले आंबेडकर ग्रामअभ्यासिका मंजूर करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येरडव (ता.राजापूर, जि. रत्नागिरी ) येथील ग्रामपंचायतीमधील ग्रामसेविकेने केलेला गैरव्यवहार

**(१०) ७८९४० (१८-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामसेविका, ग्रामपंचायत- येरडव (ता.राजापूर, जि. रत्नागिरी ) यांनी विविध करापोटी मिळणारी रक्कम बँकेत जमा न करता त्याचा अन्य कामासाठी थेट वापर करणे, १५ टक्के अनुदानातून निकृष्ट दर्जाचे साहित्य खरेदी करणे इत्यादी गैरव्यवहार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार संबंधित ग्रामसेविकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) : (**१) अंशत: खरे आहे.
(२) होय,
(३) श्रीमती सतेजा दशरथ कोचरेकर, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत येरडव यांनी करापोटी मिळणा-या रक्कमेतून कार्यालयीन कामासाठी खर्च केलेला आहे. मात्र असा खर्च करणे अनियमितता असल्याने श्रीमती कोचरेकर यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एका वर्षासाठी रोखण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कचारगड (ता.सालेकसा, जि. गोंदिया) येथील आदिवासींचे राष्ट्रीय धार्मिक स्थळातील देवस्थानाला `ब' वर्गाचा दर्जा देऊन सोई-सुविधा पुरविण्याबाबत**

**(११) ७९१०६ (१९-०४-२०१७) श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कचारगड (ता. सालेकसा, जि. गोंदिया) येथील आदिवासींचे राष्ट्रीय धार्मिक स्थळातील देवस्थानाला `ब' वर्गाचा दर्जा देऊन सोई-सुविधा पुरविण्याबाबतचा प्रस्ताव आमगाव लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्याकडे दिनांक १० मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१९) :** (१) होय.
(२) श्रीक्षेत्र पाईकोपार लिंगो मा कंकाली देवस्थान, कचारगड, ता. सालेकसा, जि. गोंदिया या तिर्थक्षेत्रास राज्य निकष समितीच्या दि. ११.०८.२०१६ रोजीच्या बैठकीत "ब" वर्ग दर्जा देण्यात आला आहे. त्यानुसार प्रस्तावित विकास कामांबाबत सक्षम प्राधिका-याची मंजूरी असलेली अंदाजपत्रके मागविण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने जाहीर केलेल्या पर्यटन धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१२) ७९१६६ (१९-०४-२०१७) श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक ४ मे,२०१६ रोजी पर्यटन धोरण जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पर्यटन धोरणांतर्गत विविध समित्या स्थापन करण्यात येणार होत्या

त्यांची स्थापना करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर पर्यटन धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-०१-२०१९) :**(१) होय
(२) मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली आहे.
(३) व (४) पर्यटन धोरण,२०१६ ची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील तिर्थक्षेत्र योजनेच्या "क" दर्जातील २१ कामांसाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(१३) ७९४६२ (२०-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील तिर्थक्षेत्र योजनेच्या "क" दर्जातील २१ कामांसाठी लागणा-या दोन कोटी पाच लाख रुपयांच्या निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हा परिषद बांधकाम विभागाने जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवला असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१९) : (**१) व (२) होय.
सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यात सिल्लोड तालुक्यातील एकूण २३ कामांचा २६६.०० लक्ष रुपयांचा प्रस्तावित बांधकामाचा कार्यक्रम सादर करण्यात आला आहे. सदर तीर्थक्षेत्र कामांच्या प्रशासकीय मान्यतेची प्रकिया चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुर येथील श्री अंबाबाई मंदिराचा तीर्थक्षेत्र विकास आराखडयातंर्गत विकास करण्याबाबत**

**(१४) ८११९६ (२१-०४-२०१७) श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्हयातील वाडी रत्नागिरी येथील श्री क्षेत्र जोतिबा येथील विकास कामांसाठी

तयार करण्यात आलेल्या विकास आराखडयासाठी २५ कोटींचा तसेच श्री अंबाबाई मंदिर परिसरातील विकासासाठी करण्यात आलेल्या तीर्थ क्षेत्र विकास आराखडयातंर्गत ७२ कोटी रूपयांचा निधी मंजुर होवूनही प्रत्यक्ष कामास अद्याप सुरूवात झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होत असल्यामुळे दर्शन मंडप उभारणे, पार्कींग, भाविकांना बसण्याची सोय, शौचालय सुविधा आदी अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखडयातंर्गत कामांना सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१), (२) व (३) होय. अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयातील वाडी रत्नागिरी येथील श्री.ज्योतिबा तीर्थक्षेत्रासाठी दि. १.८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. २५.०० कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु. ५.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे वितरीत करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही देवस्थान समितीमार्फत सूरू आहे.

शासनाकडे रु. ७२.०० कोटीचा करवीर निवासिनी श्री अंबाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखडा सादर करण्यात आला आहे. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने सदर आराखड्यास मान्यता दिलेली आहे.

---

**कोथळी तीर्थक्षेत्र (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) या तिर्थक्षेत्राच्या विकासकामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(१५) ८३२१२ (१७-०४-२०१७) श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथळी तिर्थक्षेत्र (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांना ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी नियोजन विभाग शासन निर्णय, दिनांक ४ जुन, २०१५ अन्वये सदर प्रस्ताव मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीच्या मान्यतेने शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगांव यांना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडून सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर उच्चाधिकार समिती व शिखर समितीने मान्यता दिली आहे काय,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१९) :**(१) हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, जळगांव यांनी सदर प्रस्ताव, नियोजन विभाग शासन निर्णय, दिनांक ४ जून २०१५ अन्वये जिल्हास्तरीय समित्यांच्या मान्यतेने शासनास सादर केला आहे.

(३) सद्य:स्थितीत सदर प्रस्तावास उच्चाधिकार समितीने मान्यता दिली असून शिखर समितीच्या मान्यतेसाठी कार्यवाही सूरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील काळसे धनगरवाडी या डोंगर माथ्यावर वसलेल्या लोकवस्त्यांना मुलभूत सोयी-सुविधा मिळण्याबाबत**

**(१६) ८५७२८ (२१-०८-२०१७) श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील काळसे धनगरवाडी या डोंगर माथ्यावर वसलेल्या लोकवस्ती गेल्या अनेक वर्षापासून पिण्याच्या पाणी,वीज, रस्ते आदि नागरी सुविधांपासून वंचित असल्याचे माहे मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळसे धनगरवाडीला तीन किलोमीटर अंतरावरुन पिण्याचे पाणी आणावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार सदर धनगरवाडीला तात्काळ मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१-२०१९) :** (१) अंशतः  खरे आहे.

(२)  अंशतः खरे आहे,

काळसे धनगरवाडीमध्ये सार्वजनिक विहीर असून या विहीरीचे पाणी माहे मार्च नंतर संपते.त्यानंतर तेथील लोक सुमारे २ किमी वर असणा-या झ-याचे पाणी पितात.

(३) होय

(४) याबाबत राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम या योजनेंतर्गत काम प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, सदर योजनेचा देखभाल खर्च तेथील ग्रामस्थांना परवडणारा नसल्यामुळे सदर योजना प्रस्तावित करण्यात आली नाही. सदर ठिकाणी बोअरवेल मंजूर करण्यात आलेली आहे. सदर धनगरवाडीला जाणारा रस्ता करण्यास जमीन मालकांचा विरोध असल्याने रस्ता करण्यात आलेला नाही.याशिवाय गोसावी वाडी कडून सदर धनगरवाडीसाठी रस्ता तांत्रिकदृष्ट्या योग्य होईल का याबाबत अभिप्राय देणेबाबतही गट स्तरावरुन निर्देशित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाढोणा रामनाथ (ता.नांदगांव, जि.अमरावती ) येथील बुध्देश्वर इतवारगीर महाराज संस्थानच्या पोचमार्गाचे व त्यावरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(१७) ८८८७० (१२-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढोणा रामनाथ (ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील बुध्देश्वर इतवारगीर महाराज संस्थानच्या पोचमार्गाचे व त्यावरील पुलाचे बांधकाम सुरु न झाल्याने नागरिकांची व प्रामुख्याने भाविकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,बुध्देश्वर इतवारगीर महाराज संस्थानच्या पोचमार्गाचे व त्यावरील पुलाचे बांधकाम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१९) :** (१) होय. अंशतः खरे आहे.

(२) वाढोणा रामनाथ(ता.नांदगांव जि.अमरावती येथील बुधेश्वर इतवारगीर महाराज संस्थानाच्या पोचमार्गाचे मातीकाम व मुरूमी अस्तरीकरणाचे व त्यावरील पुलाचे बांधकाम सध्या पूर्ण झाले असून पोच मार्गाच्या डांबरीकरणाचे काम सूरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायत कर्मचा-यांना नगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(१८) ९५९४८ (२२-१२-२०१७) श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायत कर्मचा-यांना नगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे लवकरच वेतनश्रेणी सुरु होणार असल्याची माहिती राहता तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचा-यांना नगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१९) : (**१) होय.हे खरे आहे.

(२) याबाबत शासनाने चौकशी केली आहे. ग्रामविकास विभागाच्या दि.२.८.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनंतर ग्रामपंचायत कर्मचा-यांना नगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी सुरू करणेबाबत अंमलबजावणी होणार असल्याचे राहाता तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी सांगितल्याचे आढळून आले.

(३) व (४) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतन व आकृतिबंधाबाबत शिफारशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीने आपला अहवाल दिनांक ३१/५/२०१८ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर अहवाल तपासून त्यावर उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**अमरावती जिल्ह्यातील ग्रामसेवकांच्या गैरवर्तनाबाबत**

**(१९) ९६०१७ (२२-१२-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील चांदुर बाजार , नांदगाव खंडेश्वर , धामणगाव रेल्वे , चांदुर रेल्वे , या तालुक्यातील मोजकेच ग्रामसेवक सोडल्यास, बहुतांश ग्रामसेवक हे आपल्या कार्यालयात उपस्थित न रहाता त्यांच्या मर्जीनुसार कार्यालयात येतात असे दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर ग्रामसेवकांना कोणत्याही हजेरीपत्रकावर सही करावी लागत नसल्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत स्तरावर थम्ब मशीन लावण्याची मागणी केली आहे तसेच तलाठी, कृषीसेवक, मंडळ अधिकारी या तीन्ही अधिकाऱ्यांचे थम्ब अपडेट करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर थम्ब मशीन लावण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गैरवर्तन करणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करण्यासह ग्रामपंचायत स्तरावर थम्ब मशीन लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) होय, अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी विविध ग्रामपंचायतींना भेटी दिल्या असता ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी हे मुख्यालयी आढळून आले नाहीत. तसेच, त्यांनी हलचल पंजीवर नोंदी सुध्दा घेतलेल्या नसल्याचे निदर्शनास आले होते.

(२) नाही.

(३) अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दि. २१.१२.२०१७ च्या पत्रान्वये ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना मुख्यालयी रहाणेबाबत सुचित केले आहे.तसेच या बाबत गट विकास अधिकारी यांना देखिल कार्यवाही करण्याबाबत सुचित  करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील मालेगाव पंचायत समिती कार्यालयाच्या परिसराची स्वच्छता करण्याबाबत**

**(२०) ९९४८० (०४-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वच्छता अभियान सुरु असताना वाशिम जिल्हयातील मालेगाव पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात सर्वत्र अस्वच्छता पसरली असून जागोजागी कच-याचे ढिग साचले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयाप्रमाणे शहरातील इतर शासकीय निमशासकीय कार्यालय परिसरातही अस्वच्छता पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन येथील शासकीय-निमशासकीय कार्यालयांच्या परिसरात स्वच्छता मोहिम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१९) : (**१) व (२) नाही, हे खरे नाही.
(३) नियमित स्वच्छता करण्यात येत असून चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरे खातेली ठाकूरवाडी (ता.रोहा, जि.रायगड) येथील आदिवासींच्या घरकुल व्यवहारात ग्रामसेविकेने केलेला गैरव्यवहार**

**(२१) १००९६१ (०६-०१-२०१८) श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे खातेली ठाकूरवाडी (ता.रोहा, जि.रायगड) येथील आदिवासींच्या घरकुल व्यवहारात ग्रामसेविकेने गैरव्यवहार केल्याची तक्रार सर्वहारा जन आंदोलन या संघटनेने दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, अलिबाग यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास,त्यानुसार आदिवासींच्या घरकुल व्यवहारात गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेविकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२८ (१६)

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :**(१) होय.
(२) प्राप्त अहवालात, संबंधित ग्रामसेविकेने कोणताही गैरव्यवहार केला नसल्याचे दिसून आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोडोली गावातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२२) १०१९६९ (०४-०१-२०१८) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील कोडोली हे परिसरातील मोठी बाजारपेठ असणारे अंदाजे ७०००० हजार लोकसंखेचे गाव आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरु असल्याने गावातील सुमारे ५० ते ५५ किमी अंतर्गत रस्त्यांची खुदाई केल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली असून पावसाळ्यात रस्त्यांना पडलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार कोडोली गावातील अंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी वेगळा निधी देवून तात्काळ रस्त्यांचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१९) :** (१) होय.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.
(३) कोडोली गावासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत कामे ९० टक्के पूर्ण झालेली असून उर्वरित कामे प्रगतीत आहेत.सदर योजनेमुळे खुदाई केल्याने खराब झालेल्या रस्त्यांवर ग्रामपंचायतीने चरभराई करुन रस्ते बुजविण्याचे काम केलेले आहे.

तसेच, मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष-२५१५-१२३८) या योजनेअंतर्गत उपलब्ध निधी विचारात घेऊन मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना निधी मंजूर करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेतला जातो. सन २०१७-१८ मध्ये मौजे वारणा कोडोली ता.पन्हाळा येथे काँक्रीटीकरण करणे या कामासाठी रु. ५.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यात अर्नाळा, सुरुची बाग व राजोडी समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करणेबाबत**

**(२३) १०३१२८ (०१-०१-२०१८) श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात अर्नाळा, सुरुची बाग व राजोडी समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे पत्रान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनेसाठी प्रधान सचिव, पर्यटन विकास विभाग यांच्याकडे रु. ३,१५,८५०/- एवढा निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) वसई तालुक्यातील अर्नाळा, सुरुची बाग व राजोडी समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करणेसाठी जीवरक्षक नेमणे, वाहनतळ निश्चित करणे, घनकचरा व्यवस्थापन, माहिती फलक लावणे, इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच सूरक्षाविषयक लाईफ जॅकेट, मेगा फोन, लाईफ बोट,वॉच टॉवर, इ. साहित्य खरेदीसाठी प्रति बीच रु. ३,१५,८५०/- प्रमाणे निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंत्योदय कामगार परिषदेद्वारे जळगाव जिल्हा परिषदेतील सफाई कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२४) १०४८९५ (०९-०४-२०१८) श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंत्योदय कामगार परिषदेद्वारे जळगाव जिल्हा परीषदेतील सफाई कामगारांच्या प्रलंबित मागणीबाबत आमरण उपोषण दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजीपासून करण्याचे पत्र दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगाव यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामगारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) : (**१)    होय.

(२)   मागण्यांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे.

(३)   प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगडमधील पर्यटनस्थळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(२५) १०५०४३ (०७-०४-२०१८) ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह रायगड जिल्ह्यात पर्यटक पर्यटनासाठी मोठ्या संख्येने येतात परंतु पर्यटनस्थळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव आणि क्षमतेपेक्षा जास्त येणाऱ्या पर्यटकांमुळे तेथील पर्यटनस्थळांमध्ये विविध समस्या निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई नजीकच्या पर्यटनस्थळांवर २५ डिसेंबर ते १ जानेवारी या कालावधीत साधारणपणे सुमारे ३ ते ४ लाख पर्यटकांनी हजेरी लावली असून एकाच वेळी एवढे पर्यटक दाखल झाल्याने वाहतूक समस्या उद्भवली तसेच शासनाकडून मिळणाऱ्या सुविधांही अपूऱ्या पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याला दोन वर्षे होऊनही मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा पर्यटनपूरक विकास व पायाभूत सुविधा विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-०१-२०१९) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) होय

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोकटे (ता.येवला,जि.नाशिक) येथील ग्रामसेवकाने शौचालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करुन केलेला गैरव्यवहार**

**(२६) १०६९३७ (०९-०४-२०१८) श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोकटे (ता.येवला,जि.नाशिक) येथील ग्रामसेवकाने शौचालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करुन गैरव्यवहार केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, येवला यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदर गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) नाही, मौजे बोकटे, ता. येवला येथे सन २०१७-१८ शौचालय बांधकाम उत्तम दर्जाचे आहे. याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, येवला यांनी समक्ष पडताळणी केली असता सर्व शौचालय वापरत असून लाभार्थी यांनी कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नाही.

(२) होय, मौजे बोकटे, ता. येवला येथील स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती येवला यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार केलेली आहे.

(३) पंचायत समिती,येवला यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली असता कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार व अनियमितता आढळून आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील चांदूरबाजार येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहीर दुरुस्ती योजनेच्या कामात ग्रामसेवकांनी केलेला गैरव्यवहार

**(२७) १०६९९४ (०९-०४-२०१८) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदूरबाजार येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर दुरुस्ती योजनेच्या कामात रॉयल्टीच्या नावाखाली ग्रामसेवकांनी शेतक-यांकडून नियमबाहय वसुली सुरु केली असल्याची बाब माहे, डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित ग्रामसेवकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) होय.

(२) होय, गट विकास अधिकारी, पंचायत समिती चांदुर बाजार स्तरावर चौकशी करण्यात आली.

(३) गट विकास अधिकारी, पचायत समिती, चांदुर यांच्या चौकशी अहवालानुसार तत्कालीन ग्रामसेवक श्री. आर.बी. हजारे यांच्या कसुरी बाबत एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आली. तसेच तक्रारीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीच्या प्राप्त निधीत रक्कम रूपये ४४१५०/- इतकी रक्कम वसुलपात्र ठरली असून त्यांच्या वेतनातून कपात करून संबंधीतांस अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील गावे बारमाही रस्त्यांना जोडण्याबाबत

**(२८) १०७१५४ (२७-०३-२०१८) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड, आजरा, राधानगरी, भुदरगड, गडहिंग्लज व शाहुवाडी (जि.कोल्हापूर) या डोंगरी तालुक्यातील गावे बारमाही रस्त्यांना जोडण्याबाबत व या रस्त्यांच्या कामासाठी भरीव स्वरुपाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींनी निदर्शने केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील गावांसाठी निधी देण्याबाबत तसेच नादुरुस्त रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) उक्त तालूक्यातील रस्ते दुरुस्तीसाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेमधून ३०५४- ग्रामीण मार्ग रस्त्यांचा विकास व मजबुतीकरण हया लेखाशिर्षांतर्गत ५११.७० लक्ष, ५०५४- इतर जिल्हा मार्ग रस्त्यांचा विकास व मजबुतीकरण हया लेखाशिर्षांतर्गत ७५१.६९ लक्ष (एकूण निधी १२६३.३९ लक्ष) इतका निधी तसेच रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम लेखाशिर्ष ३०५४ (२४१९) अंतर्गत १९५ लक्ष असा एकूण १४५८.३९ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत

**(२९) १०७२२३ (०५-०४-२०१८) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना किमान वेतनानुसार वेतन लागू असुन सदर वेतन अत्यल्प असल्याने ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतनात वाढ तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१९) :**(१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतन व आकृतिबंधाबाबत शिफारशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने शासनास अहवाल सादर केलेला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील डिसकळ ते कोंढार चिंचोली या रस्त्यावरील इजिमामध्ये पुल व जोडरस्ता बांधण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(३०) १०७३६३ (२८-०३-२०१८) श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील डिसकळ ते कोंढार चिंचोली या रस्त्यावरील इजिमा-१, कि.मी. ०/४०० मध्ये पुल व जोडरस्ता बांधण्यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे सन २०१७ मध्ये निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार उक्त मार्गावरील पुल व जोडरस्ता बांधण्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्नांकित पुल हा इतर जिल्हा मार्ग क्र. १ वर आहे. जिल्हा परिषदेस दरवर्षी उपलब्ध होणारा निधीचा स्त्रोत व निधीचे प्रमाण पाहता,सदर नवीन पुलासाठी अंदाजित रु.२५.०० कोटी निधी जिल्हा परिषद स्तरावर उपलब्ध करणे शक्य होणार नाही.

त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागास सदर पुलाचे काम खास बाब म्हणून मंजूर करण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

सदर पुलावरुन जड वाहतुक प्रतिबंधीत करण्यात आली आहे. तथापि, कोंढार, चिंचोली व परिसरातील ग्रामस्थांच्या मागणीनुसार हलकी वाहतुक सुरक्षित राहणेसाठी सन २०१७-१८ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पुलावरील पृष्ठभागाची सुधारणा करणे सा.क्र.०/०० ते १/००

मध्ये रु. २१.०० लक्ष कामास मंजूरी मिळाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील म्हासुर्ली-धामोड मार्गे**
**जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३१) १०७४४१ (०६-०४-२०१८) श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या पश्चिमेकडील म्हासुर्ली-धामोड हा रस्ता डोंगर भागातून जात असल्याने अनेक ठिकाणी मोठे चढ-उतार व नागामोडी वळणे असल्याने तसेच गेल्या अनेक वर्षात रस्त्यावर खडी किंवा डांबर पडले नसल्याने रस्त्याच्या रुंदीकरणासह रस्त्याच्या दोन्ही बाजुला संरक्षक कठडे बांधण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास,त्यानुसार रस्त्याच्या रुंदीकरणासह रस्त्याच्या दोन्ही बाजुला संरक्षक कठडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेने सदर रस्त्याची पाहणी केली आहे.
(३) सदरचा रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र. ५३ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ८.४०० कि.मी आहे. तसेच रस्ते मानकाप्रमाणे त्याची रुंदी ३.७५ मी. असून योग्य आहे. सदर रस्त्याच्या कि.मी. ४/५०० ते ६/१०० या लांबीतील काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजने मधून प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील नेवासा मतदार क्षेत्रातील दिघी येथील**
**ग्रामसेवकाने केलेला गैरकारभार**

**(३२) १०८१९४ (०९-०४-२०१८) श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील नेवासा मतदार क्षेत्रातील दिघी येथील ग्रामसेवक श्री.ढाकणे यांच्याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) सदर प्रकरणी श्री. एम.एम. ढाकणे, ग्रामसेवक यांच्या संदर्भात श्री. दत्तात्राय लक्ष्मण निकम, रा.दिघी, ता. नेवासा यांनी पंचायत समिती नेवासा गट विकास अधिकारी यांच्याकडे बदली संदर्भात तक्रार केली.या तक्रारी मध्ये श्री. ढाकणे वारंवार गैरहजर असतात त्यामुळे लोकांची कामे अडून रहातात असे नमूद केले आहे. या प्रकरणी विस्तार अधिकारी (ग्रा.पं) पंचायत समिती नेवासा यांनी चौकशी केली असता तक्रारीत तथ्य आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धोटाने खु. ते धोटाने बु. (ता.नांदगांव,जि.नाशिक) या ग्रामीण मार्गावरील भोग नदीवर पूल बांधण्याबाबत

**(३३) १०९५०९ (२८-०३-२०१८) श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धोटाने खु. ते धोटाने बु. (ता.नांदगांव,जि.नाशिक) या ग्रामीण मार्गावरील काळे वस्तीजवळ भोग नदीवर पूल नसल्यामुळे पावसाळ्यात नदीतील पाणी रस्त्यावर येऊन वाहतूकीस अडचण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार भोग नदीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, नांदगाव तालुक्यातील धोटाणे खुर्द ते धोटाणे बुद्रुक हा ग्रामीण मार्ग क्र.२ असून या रस्त्यावरील काळेवस्तीजवळ कि.मी. ०/५०० वर मोठा नाला आहे. सदर नाल्याची लांबी अंदाजे २५ मी. इतकी आहे. पावसाळ्यात सदर नाल्यात पाणी साठून वाहतूकीस अडचण होते.

सन २०१८-१९ मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत प्राप्त होणा-या नियतव्ययाच्या अनुषंगाने सदर काम समाविष्ट करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्ह्यातील रस्त्याची दुरुस्ती व सुधारण्याकरीता निधी मिळण्याबाबत

**(३४) १०९७०७ (२८-०३-२०१८) श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेने रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारण्याकरीता १,२०० कोटींची मागणी केली असताना शासनाने प्राधान्यक्रमाचा निकष लावून १५ कोटींचा फेर आराखडा मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा फेर आराखडा सादर करण्यात आला आहे काय व त्यानुसार किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेने रस्ते सुधारणा करणे कामांसाठी एकूण १२०२.६० कोटीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे केली आहे. शासनाने प्राधान्यक्रमाचा निकष लावून १५ कोटीचा फेरआराखडा मागविलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### राज्यातील आर्थिक मागासवर्ग विदयार्थ्यांना ईबीसी शिष्यवृत्तीसाठीची उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत

**(३५) ११०४५१ (२८-०३-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिक मागासवर्ग विदयार्थ्यांना ईबीसी शिष्यवृत्तीसाठीची उत्पन्न मर्यादा ६ लाखांवरुन ८ लाख करण्याचा शासनाने निर्णय घेतला असतानाही अदयाप त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक १० जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारच्या कौशल्यविकास मंत्रालयाच्या सहकार्याने राज्यातील प्रवर्गातील तरुण- तरुणींना २४ अभ्यासक्रमांचे मोफत कौशल्य विकास प्रशिक्षीत देण्याचे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील निर्णय व मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (५-०१-२०१९) :** (१) राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची उत्पन्न मर्यादा रु. ६.०० लक्ष वरुन रु. ८.०० लक्ष करण्याच्या निर्णय या विभागाच्या दि.०१/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेतला असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

तसेच, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.३१/०३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन वार्षिक रुपये ८.०० लाख करण्याबाबतचा निर्णय घेतला असून या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन सुरु आहे.
(२), (३) व (४) सदर प्रस्तावास केंद्रशासनाची तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### चांदुर रेल्वे (जि. अमरावती) पंचायत समितीतंर्गत असलेल्या ग्रामपंचायत, मांडवा येथील ग्रामसेवकाने केलेला गैरव्यवहार

**(३६) १११०४९ (०९-०४-२०१८) प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदुर रेल्वे (जि. अमरावती) पंचायत समितीतंर्गत असलेल्या ग्रामपंचायत, मांडवा येथील ग्रामसेवक श्री आर. एन. धाकडे यांनी ग्रामसभा इतीवृताचे पान चोरी केली असून चोरी केल्याबाबत तक्रारीची चौकशी होवून संबंधीतांस दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) होय.
(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती चांदुर रेल्वे यांच्याकडून श्री.आर. एन. धाकडे, ग्रामसेवक यांना दि. १८.८.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावुन खुलासा मागविण्यात आला चौकशीमध्ये श्री. धाकडे यांचा कोणताही गैरहेतु असल्याचे स्पष्ट झाले नाही. त्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोताळा ते रिधोरा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या रस्त्याची दुरुस्ती करुन या रस्त्यावरील नळगंगा नदीवर पुल बांधण्याबाबत**

**(३७) १११४६५ (०६-०४-२०१८) श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा ते रिधोरा (ता. मोताळा, जि. बुलडाणा) हा रस्ता निकृष्ट व रहदारीस योग्य नसून पुलाचे बांधकाम होत नसल्याने रिधोरा येथील नागरिकांनी निवडणूकांवर बहिष्कार घातल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नळगंगा नदीवर उपरोक्त पुलाच्या बांधकामाच्या मागणीसाठी स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केली असून निधी अभावी सदर पुलाचे बांधकाम प्रलंबीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मोताळा ते रिधोरा रस्त्याच्या पुलाच्या बांधकामासाठी निधी देवून बांधकाम पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(४) मोताळा ते रिधोरा हा २.०० कि.मी.लांबीचा योजनाबाहय रस्ता असल्याने त्यावर शासनाच्या कोणत्याही योजनेतून निधी उपलब्ध करुन देता येत नाही.

तथापि, रस्ते विकास आराखडा २००१-२१ मध्ये सदर रस्त्याचा समावेश करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यावर रस्त्याचे काम विविध योजनां अंतर्गत उपलब्ध होणा-या निधीनुसार टप्प्या टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाने गेल्या महिन्यात तीन ग्रामविकास अधिका-यांना विस्तार अधिकारी पदावर नियमबाहय पदोन्नती दिल्याबाबत**

**(३८) १११७२१ (०५-०४-२०१८) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाने गेल्या महिन्यात तीन ग्रामविकास अधिका-यांना विस्तार अधिकारी पदावर नियमबाहय पदोन्ननती दिल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पदोन्नती तात्काळ रदद करण्याचे आदेश दिले होते तसे परिपत्रक निर्गमित करुनही ग्रामविकास अधिका-यांना पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :**(१) होय.
(२), (३), (४) व (५) शासन पत्र क्र.विसप्र २०१७/प्र.क्र.१४८ आस्था-७ दि.१३ डिसेंबर, २०१७ च्या अन्वये पदोन्नत करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना पदावनत करुन कार्यमुक्त करण्यात आले. परंतु संबंधित कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केली. या याचिकेवर दि.२१.१२.२०१७ रोजी आदेश देऊन याचिका कर्त्यांनी धारण केलेले पद जैसे थे ठेवण्याचे आदेश दिल्याने सदरचे ग्रामविकास अधिकारी हे विस्तार अधिकारी पदावर कार्यरत आहेत.

---

## बुलढाणा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अफजलपूर वाडी येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३९) १११९८७ (०७-०४-२०१८) डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अफजलपूर वाडी येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत रस्त्याचे अर्धवट काम झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या अर्धवट कामांमुळे अफजलपूरवाडी येथील ग्रामस्थांना दवाखान्याच्या व इतर कामानिमित्त्त जाण्याकरिता वृध्द, महिला यांना गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी निधी देण्यासह रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.
(४) अफजलपुरवाडी बिरसिंगपुर हा ग्रामीण मार्ग ४ दर्जाचा रस्ता असून त्याची एकूण लांबी १.७ कि.मी.आहे त्यापैकी ०/०० ते १/२०० पर्यंतचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. तथापि,उर्वरित १/२०० ते १/७०० हया साखळी क्रमांकामध्ये जमिन उपलब्ध नसल्याने सदर जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत ग्रामस्थांना व लोकप्रतिनिधींना विनंती करण्यात आली आहे.

जमिन उपलब्ध झाल्यास उर्वरित रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित करुन पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आसनगांव, (ता.डहाणू, जि.पालघर) येथील राइपाडा ते भालतपाडाच्या कच्च्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत

**(४०) ११२०७९ (१८-०४-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसनगांव, (ता.डहाणू, जि.पालघर) येथील राइपाडा ते भालतपाडाच्या असलेल्या आदिवासी पाड्यातील लोकांना दळणवळणासाठी असलेल्या कच्च्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करावे अशी मागणी अनेक वर्षापासून आदिवासी ग्रामस्थांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१७ व दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व सचिव,ग्रामविकास विभाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण हे शासनाच्या ठकर बाप्पा योजनेत मंजूर होऊनही अद्याप रस्त्याचे काम न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाच्या कामासाठी किती कालावधीत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक २७ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये नागरिकांनी ग्रामविकास विभागाकडे सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत मागणी केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी अतिदुर्गम भागातील रस्ते अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४१) ११२३४६ (०५-०४-२०१८) श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी अतिदुर्गम भागात १. ओगदे पाचघर जोडरस्ता कि.मी ७ ,२. ओगदे-फणसगांव-टोकरेपाडा रस्ता किमी ५, ३. खोडदे जोडरस्ता किमी- २ आजपर्यंत पूर्ण करण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची नविन कामे मंजूर करणेकरिता शासन सन २०१८-१९ च्याआर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात कामांचे सर्वेक्षण करुन मंजूरी देणार आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अपूर्ण रस्ते पूर्ण करण्यास मंजूर देवून रस्ते पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रश्नामध्ये ३ रस्त्यांचा समावेश आहे.

(१) ओगदे पाचघर जोडरस्ता :- सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२८ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ५.०० कि.मी. आहे. या लांबीपैकी २.४०० कि.मी. लांबीत डांबरीकरणाचे काम झालेले आहे. तसेच उर्वरित लांबी मुरमी पृष्ठभागाची आहे. सदर लांबीही वन विभागाच्या जागेत येते.

(२) ओगदा फणसगांव टोकरेपाडा रस्ता :- सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.५३ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ३.९०० कि.मी. असून डांबरीपृष्ठ- भागाची आहे. सदर रस्ता काही प्रमाणात खराब झाला असून दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) खोडदे जोडरस्ता :- सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.५८ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी १.५०० कि.मी. असून खडीच्या पृष्ठभागाची आहे. सदर रस्ता खराब झाला असून दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

उपरोक्त रस्त्यांची कामे विविध योजनांद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार टप्प्याटप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मायणी (जि.सातारा) येथील मुख्य मार्गाचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत**

**(४२) ११४०७४ (२७-०३-२०१८) श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मायणी (जि.सातारा) येथील मुख्य मार्गावर होणा-या सततच्या वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून लोकसहभागातून बायपास रोड तयार करण्यात आला मात्र केवळ माती-मुरुमाच्या भरावाने तयार केलेल्या या रस्त्यावर खडीकरण व डांबरीकरण अद्याप करण्यात आले नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यासह सदर रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरण करण्यास दुर्लक्ष करणा-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नांकित रस्ता हा योजनाबाह्य रस्ता असल्याने त्यावर शासनाच्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन देता येत नाही तथापि स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सदर काम लोकप्रतिनिधी यांनी सुचविल्यास जिल्हा परिषदेला करणे शक्य होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत सासोली (ता. दोडामार्ग, जि. सावंतवाडी) येथील रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४३) ११६०५९ (११-०४-२०१८) श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत सासोली (ता. दोडामार्ग, जि. सावंतवाडी) येथील सासोली मुख्य रस्ता ते वाघमळा रस्ता खडीकरण,डांबरीकरण व दुरुस्तीच्या कामात सदरहू ग्रामपंचायतीचे कंत्राटी ग्रामसेवक यांनी अनियमितता केली असल्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक ०२ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या आदेशात शिक्कामोर्तब केले असतानाही, सदर प्रकरणी त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याबाबत जिल्हा प्रशासनाने बजावलेल्या नोटीसीचा खुलासा त्यांनी केलेला नसतानाही, नियमानुसार सेवा संपुष्टात आणण्याची कारवाई करण्याऐवजी गटविकास अधिकारी, दोडामार्ग, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग), जि. प., सिंधुदुर्ग आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., सिंधुदुर्ग यांनी संगनमताने संबधित ग्रामसेवकास शासन सेवेत नियमबाह्यरित्या कायम करण्यात आल्याची माहिती अधिकाराच्या माध्यमातून दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबधित ग्रामसेवकाचा ३ वर्षांचा कंत्राटी कालावधी प्रकरणाच्या दिवशी पूर्ण होत नसल्याने त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद (शिस्त व अपील) नियम १९६४ लागू होत नसल्याने ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एपीटी/१०००/प्र.क्र. २५२/१३, दिनांक ०६ जून, २००१ नुसार कारवाई करणे क्रमप्राप्त असल्याचा लेखी अभिप्राय कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी, जि. प., सिंधुदुर्ग यांनी दिलेला असतानाही उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम) यांनी त्याकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष करून संबधित ग्रामसेवकाची सेवा कायम करून त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्याची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व सदर प्रकरणी पदाचा, अधिकाराचा दुरुपयोग करून नियमबाह्य काम करणाऱ्या गटविकास अधिकारी, दोडामार्ग, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., सिंधुदुर्ग यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१८) :** (१) नाही. ग्रामपंचायत सासोली (ता.दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग ) येथील सासोली मुख्य रस्ता ते वाघमळा रस्ता खडीकरण, डांबरीकरण व दुरूस्तीच्या झालेल्या अनियमततेबाबत मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी काढलेल्या निष्कर्षामध्ये तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांना झालेल्या अनियमिततेस जबाबदार आहेत असे नमूद केले आहे. त्यानुसार संबंधित ग्रामसेविके विरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(२) नाही. गट विकास अधिकारी पंचायत समिती, दोडामार्ग यांच्याकडील कंत्राटी ग्रामसविकेबद्दलचा प्रस्ताव व त्यांचे ३ वर्षाच्या कामाच्या मुल्यमापनानुसार संबंधित ग्रामसेविका यांची ग्रामसेवक या पदी सेवा नियमित करण्या बाबत केलेल्या शिफारशींचा विचार करून त्यांची ग्रामसेवक या पदी सेवा नियमित करण्यात आलेली आहे.
(३) नाही. शासनाच्या निकषानुसार तत्कालीन कंत्राटी ग्रामसेविका यांची सेवा ग्रामसेवक पदी नियमित केलेली असल्याने गटविकास अधिकारी, दोडामार्ग, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्यावर शासनाकडून कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोहत्या बंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांना भाकड जनावरे सांभाळणे आर्थिक दृष्ट्या गैरसोयीचे झाले असल्याबाबत**

**(४४) १२२२९७ (२३-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोहत्या बंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांना भाकड जनावरे सांभाळणे आर्थिक दृष्ट्या जिकिरीचे झाल्याने अशी जनावरे सामाजिक संस्थांच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या गोशालेमध्ये सोडली जातात,परंतु आर्थिक अडचणींमुळे अशा सामाजिक संस्था जनावरांसाठी निवारा शेड उभारू शकत नसल्याने त्यांना ग्रामपंचायतच्या मार्फत संस्थांना सामुहिक जनावरांचे गोठे बांधण्यासाठी अशा गोठ्यांचा समावेश महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री ,रोजगार हमी योजना यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने भाकड जनावरांसाठी सामुहिक जनावरांचे गोठे बांधण्यासाठी अशा गोठ्यांचा समावेश महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या विभागाच्या शासन निर्णय दि.०५/११/२०१८ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये अभिसरणाद्वारे घ्यावयाच्या कामांमध्ये बचत गटांच्या जनावरांसाठी सामुहिक गोठे या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील कासारी नदीवरील यवलूज-पोर्ले दरम्यान असणाऱ्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४५) १२३१६४ (२३-०७-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील कासारी नदीवरील यवलूज-पोर्ले दरम्यान असणाऱ्या कोल्हापूर पध्दतीचा बंधाऱ्यातून पाणी गळती होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधा-यातुन होणा-या पाणी गळतीमुळे शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही तरीसुध्दा पाटबंधारे विभागामार्फत पाणीपट्टी वसूली करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाणीगळती संदर्भात पाटबंधारे विभागाकडे तक्रार करुनही विभागाकडून कोणतीही दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे का,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर बंधारा दुरुस्ती करण्यासह तेथील शेतक-यांना येणा-या पाणीपट्टी संदर्भात योग्य तो निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (०२-१-२०१९) :** (१) होय

(२) नाही.

यवलूज-पोर्ले बंधाऱ्यातून गळतीमुळे वाहून जाणारे पाणी बंधाऱ्याच्या खालील बाजूस असणाऱ्या शिंगणापूर बंधाऱ्यात अडविले जाते.

शिंगणापूर बंधाऱ्यातून कोल्हापूर शहरास पाणीपुरवठा होत असल्याने राधानगरी व दूधगंगा धरणामधून वारंवार पाणी सोडले जाते. त्यामुळे शिंगणापूर बंधाऱ्यातील पाण्याच्या फुगीमुळे यवलूज पोर्ले बंधाऱ्याजवळ पाणी उपलब्ध असते. सबब, शेतकऱ्यांना पाणी टंचाई भासत नाही. त्यामुळे सिंचीत क्षेत्रावर शासन नियमाप्रमाणे पाणीपट्टी आकारण्यात येते.

(३) नाही.

यवलूज-पोर्ले बंधाऱ्याच्या प्रस्तंभांची अत्यावरश्यक तातडीचे दुरूस्तीचे काम सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सिंचन प्रापण सूचीमधून करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) यवलूज कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची पडझड झालेल्या सर्व दुरूस्तीची कामे सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीमधून करणे शक्य नसल्याने विशेष दुरूस्ती/विस्तार व सुधारणांतर्गत प्रशासकीय मान्यता घेऊन करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मदनापूर मासळ जिल्हा परिषद क्षेत्रातील ग्रामपंचायत केवडा अंतर्गत मनरेगाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४६) १२३८१५ (३१-०७-२०१८) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मदनापूर मासळ जिल्हा परिषद क्षेत्रातील ग्रामपंचायत केवडा अंतर्गत सन २०११ ते २०१६ या पाच वर्षात मनरेगाच्या कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

सदर प्रकरणाची चौकशी जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्यात आली. चौकशीमध्ये बोगस मजुरांच्या नावे मजुरी अदा करणे, प्रमाणके, मोजमाप पुस्तिका, साठा रजिस्टर, अंदाजपत्रक, आकस्मिक खर्चाची देयके ग्रामपंचायतीकडे न ठेवता रक्कम अदा करणे इत्यादी कामात अनियमितता आढळून आलेली आहे. सदर अनियमिततेसाठी सरपंच, ग्रामसेवक व ग्रामरोजगार हे जबाबदार असल्याचे आढळून आलेले आहे.

(३) चौकशी अहवालानुसार संबंधित दोषी ग्रामसेवक वसरपंच यांना जिल्हा परिषद, पंचायत विभागाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असुन पुढील शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत केवाडा यांना दि. ३१/३/२०१८ या पदावरुन दुर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील दहेंद्री गट ग्रामपंचायत येथील सरपंचाने ग्रामसचिवाशी संगनमत करुन केलेला गैरव्यवहार

**(४७) १२३९२४ (३१-०७-२०१८) श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील दहेंद्री गट ग्रामपंचायत येथील सरपंचाने पदाचा गैरवापर करुन ग्रामसचिवाशी संगनमत करुन लाखोंचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सरपंच व ग्रामसचिवावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चिखलदरा यांनी दि. ०७/०४/२०१८ रोजी चौकशी केली असता सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये झालेल्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचे आढळून येत आहे.

उपरोक्त अनियमिततेमध्ये एकूण रक्कम रू. ६०,८३,२०९/- इतक्या रकमेचा संशयित रकमेचा अपहार असल्याचे आढळून येत आहे. तथापि, सदर ग्रामपंचायतीचे स्थानिक निधी लेखा, अमरावती मार्फत लेखा परीक्षण सुरू असून, लेखा परीक्षणाअंती गैरव्यवहाराची रक्कम निश्चित होईल.
(३) संबंधित सरपंच यांचेवर अविश्वास ठराव पारीत झाला असून सद्यस्थितीत ते सरपंच पदावर कार्यरत नाहीत. तसेच संबंधित ग्रामसचिव हे सेवानिवृत्त झाले असून त्यांचेविरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेळघाट (जि. अमरावती) येथील अनेक ग्रामपंचायतीमध्ये कुशल कामासाठी लागणारे गौण खनिज यांचा ५० लाख रुपयांचा महसूल ग्रामपंचायतकडे थकित असल्याबाबत**

**(४८) १२४०४९ (२८-०७-२०१८) श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि. अमरावती) येथे ग्रामपंचायत स्तरावर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार अंतर्गत अनेक ग्रामपंचायतीमध्ये कोटयवधी रुपयांची विकासकामे करण्यात आली त्यात कुशल कामासाठी लागणारे गौण खिनज यांचा ५० लाख रुपयांचा महसूल तालुक्यातील ग्रामपंचायत प्रशासनाकडे थकित असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकित रक्कम ३१ मार्च पर्यंत भरण्याचे स्पष्ट निर्देश तहसिलदार यांनी ग्रामसेवकांना दिले असून सदर रक्कम मुदतीत न भरल्यास ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्देशानुसार ग्रामसेवकांनी सदर रक्कम भरली आहे काय व सदर रक्कम ग्रामसेवकांनी भरली नसल्यास ग्रामसेवकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

अमरावती जिल्हयातील चिखलदरा तालुक्यामध्ये सन २०१४-२०१५ ते २०१७-२०१८ या कालावधीतील विविध शासकीय कार्यालयाच्या विकास कामांमध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी भरणा केली किंवा कसे याबाबत तपासणी करण्याकरीता पथक नियुक्त करण्यात आले होते. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींची तपासणी करण्यात आली. पथक तपासणी अहवालानुसार रु.१३,४०,६९२/- एवढी रक्कम शासनाकडे भरणा करणे सर्व ग्रामपंचायतींना कळविले होते. त्यानुसार इतर देय रकमेसह रु. १९,१०,५८८/- एवढी रक्कम शासनाकडे भरणा केल्याचे तहसिलदार, चिखलदरा यांनी कळविले आहे.

तसेच धारणी तालुक्यामध्ये रोहयो अंतर्गत शेतरस्ते कुशल कामांचे गौण खनिज भरणा करण्यासाठी विशेष कॅम्प घेवून रेकॉर्ड तपासण्यात आले व ग्रामपंचायतींकडून रु. ४०,७०,०५६/- एवढ्या रकमेचा भरणा केल्याचे तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

(२) होय. याबाबत संबंधित तहसिलदार यांनी संबंधितांना कळविले होते.

(३) ग्रामपंचायत कार्यालयांनी सन २०१४-२०१५, २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ या कालावधीमधील गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम भरणा केल्याबबात Grass प्रणाली वर तसेच चलन पासिंग नोंदवही वरून दिसून येते, असे संबंधित तहसीलदार व गट विकास अधिकारी यांनी कळविले आहे. सबब, गौण खनिजाची रक्कम भरली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील घटप्रभा नदीवर पिळणी व भोगोली या कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४९) १२४८९३ (२३-०७-२०१८) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कानुर बु. ते भोगोली येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे पिलर आणि बांधकामातील दगड ढासळल्याने बंधाऱ्याला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे बंधाऱ्याला गळती लागल्यामुळे भोगोली कानूर पुंद्रा व कानूरी खुर्द या गावातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळत नाही तसेच कानूर खुर्द व पिळणीला जोडणारा पिळणी कोल्हापूरी बंधाऱ्याला देखील गळती लागली असल्याने शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही कोल्हापूरी बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या दोन्ही बंधा-याच्या कामाची पहाणी शासनाने केली आहे काय व त्यानुसार उक्त दोन्ही बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२०-१२-२०१८) :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

पिळणी कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या पायामधून अल्प प्रमाणात गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, पिळणी व बिजुर भोगोली या दोन्ही कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी दिले जात आहे.

(३) होय.

(४) सदर दोन्ही कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांची दुरूस्ती महामंडळ स्तरावर शासन निर्णय दि.१७/११/२०१६ मधील तरतुदीनुसार बिगर सिंचन पाणीपट्टीच्या निधीमधून करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यामध्ये जिल्हा नियोजन समिती गोंदियामार्फत "५०५४ योजनेअंतर्गत" रस्त्यांची केलेली कामे नियमबाह्य असल्याबाबत**

**(५०) १२५५६६ (२०-०७-२०१८) श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यामध्ये जिल्हा नियोजन समिती गोंदिया मार्फत सन २०१६-२०१७ वर्षाकरिता "५०५४ योजनेअंतर्गत" ३ लाख रुपये लागत असलेली ग्राम अंतर्गत रस्त्यांची अनेक नियमबाह्य कामे मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार सदर कामे प्रस्तावित करणाऱ्या आणि कामे मंजूर करणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१-२०१९) :** (१) व (२) जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचेमार्फत सन २०१६-१७ करीता ५०५४ या योजनेंतर्गत ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. जिवायो/१०१५/प्र.क्र.१९१/पं.रा. ८, दि. ०३/०९/२०१६ मधील विहित मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्रस्ताव मागविण्यात आले व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग १ व २ गोंदिया यांचेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या रु. ३.०० लक्षच्या १०४ कामांपैकी नियोजन विभागाच्या शासन निर्णय, दि. १६/०२/२००८ अन्वये प्रत्येकी रु. ३.०० लक्षच्या १०१ कामांना प्रशासकीय मान्यता देऊन जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचेकडून

निधी वितरीत करण्यात आला. तथापि, यासंबंधी मा. लोकप्रतिनिधी यांचेकडून जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचेविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यामुळे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचेकडून अहवाल मागविण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.